सकाळ TODAY
कोल्हापूर, शनिवार, २७ सप्टेंबर २०२५

# ऋग्वेद, भार्गवी, इंद्रनील, प्रणव आदींचे यश

## महापालिकास्तर शालेय नेमबाजी स्पर्धा : विविध गटांत शेकडो विद्यार्थ्यांचा सहभाग

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २६ : शालेय महापालिकास्तर नेमबाजी स्पर्धेत ऋग्वेद खोत, भार्गवी पाटील, इंद्रनील चाळके, प्रणव पवार आदींनी विविध गटांत पहिला क्रमांक पटकाविला.

दुधाळी शूटिंग रेंजवर झालेल्या या स्पर्धेत ओपन साईट एअर रायफल - चौदा वर्षांखालील गटात मुलांमध्ये ऋग्वेद खोत (राधाबाई शिंदे स्कूल), आरव भोसले (न्यू मॉडेल इंग्लिश स्कूल), प्रणव बिराजदार (पोदार स्कूल), तर मुलींमध्ये भार्गवी पाटील (राधाबाई शिंदे स्कूल), स्वरा सुतार (महावीर इंग्लिश स्कूल), आर्णवी पाटील (छत्रपती शाहू विद्यालय).

सतरा वर्षांखालील गटात मुलांमध्ये इंद्रनील चाळके, अथर्व भुरले (छत्रपती शाहू विद्यालय), विदांत लेले (विमला गोयंका स्कूल), मुलींमध्ये सृष्टी हारुगले (विमला गोयंका स्कूल) ऐश्वर्या जाधव (प्रायव्हेट हायस्कूल), स्नेहांकिता चौगुले (प्रिन्स शिवाजी इंग्लिश स्कूल),

एकोणीस वर्षांखालील गटात मुलांमध्ये प्रणव पवार (डॉ. डी. वाय. पाटील ज्युनिअर कॉलेज), शिवेंद्र खतकर (प्रिन्स शिवाजी इंग्लिश मिडियम स्कूल), प्रसेन इंगळे (न्यू इंग्लिश मीडियम स्कूल), तर मुलींमध्ये श्रिया माने (डी. आर. के. कॉलेज), आदिती भंडारी (पद्माराजे हायस्कूल), जोया काझी (कमला कॉलेज).

पीपसाईट एअर रायफल : चौदा वर्षांखालील गटात मुलांमध्ये आयुष्मान दराडे (सेंट झेविअर्स स्कूल), राजवर्धन मोटे-पाटील (संजीवन स्कूल, रंकाळा), समरजित लोंढे (शाहू विद्यालय), तर मुलींमध्ये आयुषी शिंदे (शांतिनिकेतन स्कूल).

पीपसाईट १७ वर्षांखालील मुलांमध्ये श्लोक राऊत (सेवंथ डे स्कूल), वरदराज पोवार (प्रायव्हेट हायस्कूल), भूषण पाटील (विवेकानंद कॉलेज). तर मुलींमध्ये स्वरा मगदूम (डीआरके कॉलेज), हिरण्या सासने (प्रिन्स शिवाजी इंग्लिश स्कूल), निर्झरा पाटील (न्यू कॉलेज), तर मुलींमध्ये काव्यांजली नकाते (राजाराम महाविद्यालय), श्रीनिधी कोगनिळे (न्यू कॉलेज), रसिका कुसाळे (चाटे स्कूल ज्युनिअर कॉलेज).

एअर पिस्टल : १४ वर्षांखालील मुलांमध्ये आराध्या कांबळे, उन्नती जाधव, सारा गडकरी (सर्व विमला गोयंका इंग्लिश स्कूल). १७ वर्षांखालील गटात आदित्य वायचळ (स. म. लोहिया हायस्कूल), दर्श पाटील (पोदार स्कूल), वरद विभूती (न्यू इंग्लिश मीडियम स्कूल), तर मुलींमध्ये काव्यांजली बरगे (उषाराजे हायस्कूल), स्वरांजली जाधव (छत्रपती शाहूविद्यालय), प्रसन्ना भोसले (एम. एल. जी. स्कूल).

१९ वर्षांखालील मुलांमध्ये ऋषिराज पाटील (न्यू कॉलेज), अथर्व कुंभार (गोपालकृष्ण गोखले कॉलेज), आदिनाथ जाधव (विवेकानंद कॉलेज), तर मुलींमध्ये गौरी चव्हाण, हर्शिका पटेल (न्यू मॉडेल ज्युनिअर कॉलेज), दिशा यादव (न्यू कॉलेज).

संक्षिप्त

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुणांचा विकास : डॉ. टी. एम. चौगुले

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा व नेतृत्व गुण विकास करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना महत्त्वाची आहे. या योजनेच्या माध्यमातून विद्यार्थी समाजप्रिय होऊ शकतो, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. टी. एम. चौगुले यांनी केले. विवेकानंद महाविद्यालयात आयोजित एन.एस.एस.च्या वर्धापन दिन व नशामुक्त अभियान कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. पी. आर. बागडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. हेमंत पाटील यांनी आभार मानले. साक्षी क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. पाहुण्यांची ओळख डॉ. बी. टी. दांगट यांनी केली. नशामुक्त अभियानाची शपथ प्रा. ए. बी. वसेकर यांनी विद्यार्थ्यांना दिली. यावेळी डॉ. संदीप पाटील, डॉ. राजश्री पाटील, प्राध्यापक व स्वयंसेवक उपस्थित होते.